- **सुषमा पेंढरकर** (विन्टर पार्क, फ़्लोरिडा)

## अजब तुझी जादू

तूं म्हणजे काय अजब जादू आहेस
म्हणजे तूं काय आणि कशी आहेस
अशी आहेस तूं की तशी आहेस
याच विचारात माझे मन गुंतून आहे

आणि काय तुझा खास तो तोरा
चुकवतोच नक्की हृदयाचा ठोका
आणि काय तो विलक्षण फणकारा
जणुं डिंवचलेल्या नागाचा फ़णा

आणि तुझं ते हसणं खिदळणं
कानावर पडलं कीं माझा जीव हरवणं
तूं ना असं वेड लावून जातेस
कीं काहीं म्हणजे काहीच होते सुचेनासे

तुझ्या रंग रुपाला एक ताठा आहे
त्यात पण एक मधुर प्याला आहे
कोणी जर जावू पाहिल तुझ्या वाटेला
तर नक्कीच दाखवशील ज्याची जागा त्याला

तूं सारं काहीं न बोलताच सांगतेस
तुझी नजर सहजच भेदून आरपार जाते
तिच्या धाकातच राहणे सोपे सहज वाटते
निदान तुझाच आधार आहेसे वाटते

सर्वस्वी तुझ्या अंकित होऊन राहणे
हे माझे स्वप्न प्रत्यक्षात उतरावे
हे स्वप्न फार महत्वाकांक्षी आहे कां
सांग तूंच हे कधीतरी खरे होईल कां